राज्यातील अल्पसंख्याक बहुल भागातील विद्यमान औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत दुसरी / तिसरी पाळी सुरू करणे. सन २०१७-१८ करिता निधी वाटप.

महाराष्ट्र शासन
अल्पसंख्याक विकास विभाग
शासन निर्णय क्रमांकः औप्रसं-२०१७/प्र.क्र. ४६/का.८
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
दिनांक: २५ सप्टेंबर, २०१७.

वाचा -

१) उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय क्रमांक - आयटीआय-००९/(११/०९)/व्यशि-३, दि. २९ ऑगस्ट, २००९ व दि.२१ ऑगस्ट, २०१०
२) वित्त विभाग, शासन परिपत्रक क्रमांक - अर्थसं-२०१७/प्र.क्र.७५/अर्थ-३, दि.१८ एप्रिल, २०१७.
३) अल्पसंख्याक विकास विभाग, शासन परिपत्रक क्रमांक - अविवि-२०१७/प्र.क्र.३१/ का.७, दि.१९ एप्रिल, २०१७.
४) अल्पसंख्याक विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक - औप्रसं-२०१७/प्र.क्र. ४६/का.८, दि.२९ मे, २०१७.
५) वित्त विभाग, शासन परिपत्रक क्रमांक - अर्थसं-२०१७/प्र.क्र.९४/अर्थ-३, दि.३० जून, २०१७.
६) प्रभारी संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, मुंबई यांचे पत्र क्र.१२/नियोजन/२०१७/प्र.क्र.२२/९६, दि.११ ऑगस्ट, २०१७.
७) कौशल्य विकास व उद्योजकता विभाग, शासन निर्णय क्रमांक - बियुडी : १७१६/२०१६/ २०१६/प्र.क्र.७९/रोस्वरो-२, दि.२० एप्रिल, २०१६.

प्रस्तावना -

राज्यातील अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांसाठी ४२ अल्पसंख्याक बहुल भागातील विद्यमान औद्योगिक प्रशिक्षण संस्थामध्ये दुस-या/तिस-या पाळीत २४८ तुकडया त्याचप्रमाणे बृहन्मुंबईतील मांडवी व चांदिवली (पवई) येथे नव्याने सुरू होणा-या २ नवीन शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये २८ तुकडया सुरू करण्यास संदर्भ क्र.१ च्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार "मागणी क्रमांक झेडई-१, २२३५ सामाजिक सुरक्षा व कल्याण, ०२ समाजकल्याण, २००-इतर कार्यक्रम, राज्य योजनांतर्गत योजना, (००) (१६) अल्पसंख्याक विद्यार्थ्यांसाठी विद्यमान औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये दुसरी व तिसरी पाळी सुरू करण्यासाठी सहाय्यक अनुदान, (२२३५ ए ५३४)" या लेखाशीर्षाखाली सन २०१७-१८ करिता रु.१५.०० कोटी इतकी तरतूद अर्थसंकल्पीत करण्यात आली आहे. वित्त विभागाच्या संदर्भ क्र.२ व ३ च्या परिपत्रकान्वये सन २०१७-१८ या आर्थिक वर्षातील प्रथम नऊ माहीकरिता आवश्यक असणारा अनिवार्य कार्यक्रमावरील खर्चाचा अर्थसंकल्पित निधीच्या एकूण वार्षिक तरतूदीच्या ८०% च्या मर्यादेत म्हणजेच रू.१२.०० कोटी निधी उपलब्ध करण्यात आला. त्यापैकी संदर्भ क्र.४ च्या शासन निर्णयान्वये रू.३,८७,००,०००/-(अक्षरी रू. तीन कोटी सत्याऐंशी लक्ष फक्त) मंजूर निधी वितरीत करण्यात आला आहे.

संदर्भ क्र.५ येथील वित्त विभागाच्या परिपत्रकान्वये सन २०१७-१८ या आर्थिक वर्षाकरिता आवश्यक असणारा अनिवार्य कार्यक्रमावरील खर्चाचा अर्थसंकल्पित निधी एकूण वार्षिक तरतूदीच्या ७० % च्या मर्यादेत वितरित करण्याच्या सूचना निर्गमित केल्या आहेत. त्यानुसार सन २०१७-१८करिता बी.डी.एस प्रणालीवर रू.१०,०५,००,०००/- (अक्षरी रू.दहा कोटी पाच लक्ष फक्त) उपलब्ध आहे. त्यामुळे संदर्भ क्र.४ च्या शासन निर्णयान्वये वितरित रू.३,८७,००,०००/-(अक्षरी रू. तीन कोटी सत्याऐंशी लक्ष फक्त) वजा करता रू.६,१८,००,०००/-(अक्षरी रू.सहा कोटी अठरा लक्ष फक्त) निधी शिल्लक आहे. संदर्भ क्र.६ च्या पत्रान्वये माहे सन २०१७-१८ करिता प्रभारी संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, मुंबई यांनी उर्वरित निधी वितरीत करण्याची मागणी केलेली आहे. सदर मंजूर निधीपैकी ७०% च्या मर्यादेत निधी वितरित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय -

अल्पसंख्याक समाजातील विद्यार्थ्यांसाठी सुरू करण्यात आलेल्या ४२ विद्यमान शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था तसेच बृहन्मुंबईतील मांडवी व चांदिवली (पवई) येथे नव्याने सुरू होणाऱ्या २ नवीन शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थाकरिता वित्त विभागाच्या संदर्भ क्र.६ च्या परिपत्रकान्वये सन २०१७-१८ या आर्थिक वर्षाकरिता आवश्यक असणारा अनिवार्य कार्यक्रमावरील खर्चाचा अर्थसंकल्पित निधी एकूण वार्षिक तरतूदीच्या ७० % मर्यादेत शिल्लक निधी रू.६,१८,००,०००/-(अक्षरी रू.सहा कोटी अठरा लक्ष फक्त) पैकी रु.४,००,५०,०००/-(अक्षरी रू.चार कोटी पन्नास हजार फक्त) निधीचे खालीलप्रमाणे वितरीत करण्यास याव्दारे शासन मान्यता देण्यात येत आहे :-

मागणी क्रमांक झेडई-१, २२३५ सामाजिक सुरक्षा व कल्याण, ०२ समाजकल्याण, २००-इतर कार्यकम, राज्य योजनांतर्गत योजना, (००) (१६) अल्पसंख्याक विद्यार्थ्यांसाठी विद्यमान औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये दुसरी व तिसरी पाळी सुरू करण्यासाठी सहाय्यक अनुदान, (२२३५ ए ५३४)	सन २०१७-१८ साठी अर्थसंकल्पित करण्यात आलेले अनुदान	वित्त विभाग, परिपत्रक दि.३० जून, २०१७ अन्वये प्राप्त ७०% मर्यादेस अनुसरून उपलब्ध निधी (अर्थसंकल्पित निधीच्या ७०% प्रमाणे)	शासन निर्णय दि.२९ मे, २०१७ अन्वये वितरीत निधी	माहे डिसेंबर, २०१७ अखेर (नऊ माहीकरिता) बी.डी.एस. वर उपलब्ध निधीच्या ७५% मर्यादेपर्यंत वितरित करावयाचा निधी(रकाना ३-४)
१	२	३	४	५
०१, वेतन	१४,५०,००,०००/-	१०,१५,००,०००/-	३,८७,००,०००/-	३,७४,२५,०००/-
०६, दूरध्वनी, वीज, पाणी शुल्क	१५,००,०००/-	१०,५०,०००/-	--	७,८७,५००/-
१०, कंत्राटी सेवा	१२,००,०००/-	८,४०,०००/-	--	६,३०,०००/-
११, देशांतर्गत प्रवास खर्च	३,००,०००/-	२,१०,०००/-	--	१,५७,५००/-
१३, कार्यालयीन खर्च	४,००,०००/-	२,८०,०००/-	--	२,१०,०००/-

१४, भाडे, पट्टी व कर	२,००,०००/-	१,४०,०००/-	--	१,०५,०००/-
२१, पुरवठा व सामुग्री	३,००,०००/-	२,१०,०००/-	--	१,५७,५००/-
२४, पेट्रोल, तेल व वंगण	४,००,०००/-	२,८०,०००/-	--	२,१०,०००/-
२६, जाहिरात व प्रसिध्दी	५०,०००/-	३५,०००/-	--	२६,२५०/-
२७, लहान बांधकामे	१,५०,०००/-	१,०५,०००/-	--	७८,७५०/-
२८, व्यावसायिक सेवा	२,००,०००/-	१,४०,०००/-	--	१,०५,०००/-
३४, शिष्यवृत्त्या/ विद्यावेतन	२,५०,०००/-	१,७५,०००/-	--	१,३१,२५०/-
५२, यंत्रसामुग्री व साधनसामुग्री	५०,०००/-	३५,०००/-	--	२६,२५०/-
एकूण	**१५,००,००,०००/-**	**१०,५०,००,०००/-**	**३,८७,००,०००/-**	**४,००,५०,०००/-**

२. कौशल्य विकास व उद्योजकता विभाग यांचे संदर्भ क्र.७ अन्वये निधी वितरीत करण्याकरिता नवीन नियंत्रक अधिकारी, संचालक (प्रशिक्षण), (२२३०) झेए-१०००४ असे सुधारित करण्यात आले आहे. सदर तरतूद यापूर्वीच्या खर्चाच्या उपयोगिता प्रमाणपत्र सादर करावयाच्या अटीच्या अधिन राहून संचालक, (प्रशिक्षण) व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्याकडे सुपूर्द करण्यात येत असून याकरिता ते "नियंत्रक अधिकारी" आणि त्यांनी प्राधिकृत केलेले दुय्यम अधिकारी "आहरण व संवितरण अधिकारी" म्हणून काम पाहतील.

३. संचालक, (प्रशिक्षण) व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय यांनी निधी वितरीत करतांना तसेच तो खर्च करतांना महाराष्ट्र अर्थसंकल्पीय नियमपुस्तिका, वित्तीय अधिकार नियमपुस्तिका, प्रशासकीय मान्यता आदेश व वेळोवेळी निर्गमित केलेले शासन निर्णय इत्यादी मधील अटी व शर्तीची पूर्तता करण्यात यावी.

४. या योजनेअतंर्गत अल्पसंख्याक समाजातील विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात येऊन त्याचा तपशील वेळोवेळी अल्पसंख्याक विकास विभागास सादर करावा. तसेच सदर अनुदान ज्या प्रयोजनासाठी मंजूर करण्यात आले आहे त्याच प्रयोजनासाठी खर्च करण्यात यावे व केलेल्या खर्चाचा तपशील व उपयोगिता प्रमाणपत्र (Utilization Certificate) संचालक (प्रशिक्षण), व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी विहीत मुदतीत शासनास आणि महालेखापाल कार्यालयास सादर करावे.

५. " सदर शासन निर्णय वित्तीय अधिकार नियम पुस्तिका-१९७८ भाग पहिला, वित्त विभाग, शासन निर्णय क्र. विअप्र २०१३/प्र.क्र.३०/२०१३/विनियम, दि. १७ एप्रिल, २०१५ अन्वये प्रशासकीय विभागास प्राप्त झालेल्या अधिकारांतर्गत किंवा त्या त्या विभागास वेळोवेळी वित्तीय अधिकार नियम पुस्तिका भाग-२ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार तसेच शासन परिपत्रक, वित्त विभाग क्र. अर्थसं-२०१७/प्र.क्र.७५/ अर्थ-३, दि. १८ एप्रिल, २०१७ मधील परिच्छेद ७ ते १८ येथील अटींची व त्यासोबतच्या परिशिष्टांमधील अ.क्र. ३ व ९ मधील अटींची तसेच वित्त विभागाच्या दि.३० जून, २०१७ च्या परिपत्रकातील अटींची पुर्तता होत असून प्राप्त मान्यतेस अनुसरून निर्गमित करण्यात येत आहे. "

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक क्र. २०१७०९२५१५५२११२९१४ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Samir Ramesh Salunkhe

Digitally signed by Samir Ramesh Salunkhe
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Minorities Development, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=ba9951375d8539e02179fc093b36c7c7d7a866fc20f129ea0ff67bbde52fa539, cn=Samir Ramesh Salunkhe
Date: 2017.09.25 15:41:14 +05'30'

(समीर साळुंखे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. महालेखापाल, (लेखा परिक्षा) महाराष्ट्र राज्य, मुंबई / नागपूर
२. महालेखापाल, (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र राज्य, मुंबई / नागपूर
३. प्रधान सचिव, कौशल्य विकास व उद्योजकता विभाग, मंत्रालय, मुंबई,
४. संचालक (प्रशिक्षण), व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
५. प्राचार्य, औद्योगिक प्रशिक्षण संस्था (सर्व), महाराष्ट्र राज्य, संचालक (प्रशिक्षण),व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय यांचे मार्फत अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
६. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई,
७. सर्व संबधित जिल्हा कोषागार अधिकारी, संचालक (प्रशिक्षण), व्य.शि. व प्र. संचालनालय यांचे मार्फत
८. नियोजन विभाग का. १४७५,
९. वित्त विभाग, व्यय-४/ अर्थ-३ व १४,
१०.अवर सचिव (का.७), अल्पसंख्याक विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांना विनंती करण्यात येते की, **सदर रक्कम व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयाच्या संचालक, (प्रशिक्षण)-(२२३०) झेडए-१, ०००४ वर बी.डी.एस. तात्काळ उपलब्ध करून देण्याची विनंती करण्यात येत आहे.**
११. निवडनस्ती.